# मंगलाष्टके

विद्याधीश गणेश हा गणपती विघ्ने दूरी सारितो

टाका अक्षत आणि घुमवा मंगल मंत्र महान

म्हणा शुभमंगल सावधान ।

महा गणपती दारावरती दिसे सौख्यदाता

श्री गजानना वंदन करू या । तोच विघ्नहर्ता

या कार्यासी यावे देवा । करितो तुझा सन्मान

म्हणा शुभमंगल सावधान ।

कार्यारंभी उमा-महेशसुत जो वंदू तया मोरया

माताजी कुलस्वामिनी । नमूं तया ही आपुली रेणुका ।

यावे आपण सर्व देव मिळूनी । कार्यास या शुभदिनी

द्यावे आज आशीर्वचा वधुवरा । कुर्यात सदा मंगलम् ।।

शोभे मंगलमूर्ती तोरण पहा । दारी घुमे चौघडा ।

वाटे दाही दिशा सुखा बहरण्या आनंद घाली सडा

लग्नाचा सुखसोहळा प्रभुकृपे । आजी तुझ्या पातला

कर्तव्यासह जाणुनी श्रमुनिया । अर्पित भाऊ तुला ।

स्वस्ति श्री गणनायकं गजमुखं मोरेश्वर सिध्दीद्म

बल्लाळे मुरूडं विनायकं । चिंतामणी स्थेवरम ।

लेण्याद्रि गिरिजात्मकं । सुवरदं विघ्नेश्वरम् ओझरम्

ग्रामो रांजण संस्थित गणपतिः । कुर्यात सदा मंगलम्

स्वस्ति श्री गणनायका नमुनिया । प्रार्थी महामंगल ।

छाया आशीष हो वधुवरा । हांकारिले मोरया

आहे हे शुभकार्य सदनी । एकत्र आले जन

आनंदे मिळून सर्व म्हणतील । कुर्यात सदा मंगलम् ।।

भाग्याचा दिन आज मंगल प्रभा । या मंडपी साजरी ।
लेवोनि हिरवा चुडा नववधू । उत्फुल्ल ही हांसरी ।
आली आज समीप लग्नघटिका आप्तेष्ट आले घरी ।
व्हावे सत्वर सावधान हृदयी । कुर्यात सदा मंगलम् ।।
कन्या माझी न ठेव आज आपुली । देतो करी मी जरी
आनंदे भरले मन जरी । व्यथा जाणीव कोठे तरी ।
साहुनी विरहा संबंध जुळती । का हे नवे रेशमी ।
अर्पुनी मम कन्या प्रभुदिता । झालो असे धन्य मी ।।
ज्याला लौकीक सृष्टी माजी असती । शुभ मंगलादि संज्ञा की
आहे ऐक्य जीवाशिवातील किती । ते जाणते सांगती ।
जाणो क्षण हा उदात्त जन हो । या कारणे करा ।
निष्ठा ठेवुनिया अनन्य करूं या । कुर्यात सदा मंगलम् ।।
रूपाने अति देखणा वर जसा । शरदांतला चंद्रमा
लावण्ये अनुरूप वधू ही । गाली खुले रक्तिमा
राहो शाश्वत भाव हृदयी । हे शब्द ना विस्मरा ।
होवो मंगल बोलती बहुजन । आशीरवचांना स्मरा ।।
स्वप्नांच्या दुनियेत जीव रमला । हृदयामध्ये आर्तता ।
अर्धोन्मिलीत नेत्र हे सुचविती प्रीतीतली दिव्यता ।
प्रीती कोकीळ वृक्षपर्ण कुहरी । आलापितो सुस्वरा ।
होवो मंगल बोलती बहुजन । आशीर्वचांना स्मरा ।
आला दुर्लभ योग आज बघण्या । शालीन या वधुवरा ।
भासे की हरी रूक्मीणीस बघण्या येई तिच्या मंदिरा ।
तो स्वप्नील सलज्ज भाव बघुनी । सुखावित अभ्यंतरा ।
होवो मंगल बोलती बहुजन । आशीर्वचांना स्मरा ।।

प्रात:काल समीप येत असतां । लाली चढे अंबरा ।
पूर्वी लाजुनी चूर गंध पसरे । दाही दिशा कापरा ।
आता तू विकसित तू कन्ये । आला वर हा घरा ।
आनंदे क्षण हाच स्मरणे । कुर्यात सदा मंगलम् ।।

---

प्रीतीच्या दृढ बंधने विकसिती विकार । पुष्पे लतेच्या शिरी ।
साऱ्या विश्वे सुवास पसरे । तैसा तुझ्या सासरी ।
त्यागाने विनये सुशील वचने । हो प्रिय तू सत्वरी ।
प्रीतीची नवबाग ही सुखद हो । कुर्यात सदा मंगलम् ।।
कृष्णेला मिळण्यास आतुर जशी । वाहे पहा कोयना ।
तैसा संगम हा घडो जीवनी । आहे खरे होय ना ।
नांदा सौख्यभरे आशीर्वच तुम्हां । हो पूर्ण त्या कामना ।
होवो जीवन संगमी समृध्दहि । कुर्यात सदा मंगलम् ।।
आहे जीवन संगर । इथे संसार सांगे पहा ।
झुंजोनी यश प्राप्त होत असते । हा मंत्र आहे महा
आत्म्याचा अपुला विकास करण्या । आयुष्य पुष्पे वहा
देवो देव तुम्हां सदैव सुयशा । कुर्यात सदा मंगलम् ।।
जीवन भवसागरी या विहरू दे । तारू तुझे सर्वदा ।
नावाडीच सदैव साथ करतो । वडिलास हे श्रेष्ठता ।
देवाला विसरूं नकोस कधीहि । राष्ट्रास हे भूषण ।
अध्यात्मा स्मरूनी आशीर्वच तुम्ही । कुर्यात सदा मंगलम् ।।
तोतया निधी हा समुद्र तळीचा । रत्ने तिथे राहती ।
देवाची करणी अगाध म्हणुनी । तळ ते स्वये
जेष्ठांना वडिला समान गणुनी । दोन्ही कुळे भूषणी

आशीष तुला मुली गं अमुचा । कुर्यात सदा मंगलम् ।।

मायेचा जगी खेळ हा वसतसे । पुरूषास ही प्रकृती ।

शोभे तैसी वधु जीवनसखी । अमुच्या या वराप्रती ।

वरमाला कमला स्नुपा कमलीनी । देखोनी आनंदली ।

देई आज आशीष वधुला । कुर्यात सदा मंगलम् ।।

शोभे आज सलज्ज वधु ही । दृष्टीस जी सोज्वळ ।

आहे सूज्ञ हा वर तिला । शोभे पति देव तो ।

अर्पोनी कमलासमान मन हे । पूजी तूं या वरा ।

इच्छा हीच धरोनी आज कथितो । कुर्यात सदा मंगलम् ।।

---

धन्वंतरी यंत्रज्ञ योग जमुनी । आला सुदैवे पहा ।

कन्या पुत्र विवाह संमत असे । हा न्याय त्यांच्या जरी ।

रक्षावे कुल प्रीती कीर्ती धरूनी । सन्मार्ग तो प्रीतीचा ।

आशीर्वाद तुम्हां वधुवरा । कुर्यात सदा मंगलम् ।।

तुळजापूरवासिनी भवानी देवी । कार्यास यावे सत्वर ।

ब्रह्मा शंकर आणि अनंत । कृपेने आपण साह्य करावे ।

खंडेरायास वंदुनी आता । हे गाऊं मंगलगान ।

बोला शुभमंगल सावधान ।।

---

येता हा उदयास भास्कर नभी । पूर्वा दिशा हांसली ।

आला हा जवळी वसंत म्हणुनी । धरणी ही आनंदली ।

रविराजा बघताच कमलिनी । हर्षे पहा विकसली ।

या काली उषेस पती रवि । माला करी घेतली ।

येई मंडपी लाजुनी ही वसुधा । माला करी घेऊनी

शोभे हा रविराज तिजला । चंद्रासहि रोहिणी
येतां मंगल वेळ जवळी । घाली माला गळां सुखे या वरा ।
होई संगम हा मिळेल सरिता । रविराजा या सागरा ।
पित्याचे कुल सोडुनी पतिगृही । जाशी आता तू कन्यके ।
असुरांचे घरी सत्कुळी गृहिणी होशी सुकन्ये आता ।
जोडा पाहुनी संतोषले तुझे मातामह तत्वता ।
आहे दोन्ही कुळास धन्य करणे । हाती तुझ्या कन्यके ।।
प्रारंभी कुलदेवता गणपती । वंदुनिया प्रार्थिते ।
आता पूर्ण करी विवाह विधी हा । निर्विघ्न हे मागणे ।
दारी तोरण चौघडा सुखवितो । आलाप तो सुस्वर ।
होई योगबले पहा मीलन ते । ज्ञानी अुभयता वधुवर ।।
येई मंडपी निशीकांत सुत हा । मम राजा गुणी ।
धन्वंतरी ही कुलवधु । होई तुझी स्वामिनी ।
येतां मंगळ वेळ जवळी । घालील ती पुष्पमाला गळा ।
होई बंधन पुष्पमुक्तजीवना हे मूल्य आजि खरे ।।
वधु कुमुदिनी गौर युवती । आली पहा मंडपी लाजरी ।
मामा ही असता बरोबर तिचे का जाहली बावरी ।
कन्या सुस्थळ पाहुनी जनक हा चिंतामणी देतसे असावे ।
माता सरस्वती मनी बहु निश्चिंत झाली असे ।।
सुखवाया पीडितास ज्ञान अपुले । वेचा तुम्ही सर्वदा ।
संघर्षा मतभेदा टाळुनिया सदा । ध्येया न सोडा कदा ।
दीर्घायुष्य सुकीर्ती या वधुवरा देवो प्रभु निर्मल ।
होवो हा शुभविवाह जगती । कुर्यात सदा मंगलम् ।।
विद्यालंकित होऊन भूषविले सुकन्य । तूं त्वत कुला ।

आहे उज्ज्वल काल पुढती । होईल यशस्वी खरा ।
दिधली ही बहुमोल ठेव आम्ही । तुझ्या करी आज ही ।
मिळविल यश सौख्य संपदा । नांदा सुखे भुवरी ।।
दीनांना करूनी सहाय्य जगी या । कर्तव्य सोडू नका ।
द्रव्याचा अभिमान ही करू नका । लोभात गुंतू नका ।
राष्ट्राला विसरू नका । स्वजनहि आप्तेष्ट सोडू नका ।
असे प्रार्थुनी सकलहि वदतसे । कुर्यात सदा मंगलम् ।।

---

राधाकृष्ण सीता रघुपती । हे आश्रमी राहिले,
सौख्याने अन् शिलवान बनुनी । कर्तव्या न सोडिले (त्यागिले) ।
संसारी असता सदा तुम्ही । कर्तव्यपरायण रहा ।
नांदा प्रेमभरे सदा सततहि । कुर्यात सदा मंगलम् ।।
लावू सुंदर तोरणे सुबक शामला पताका तया ।
धुपाचाहि पवित्र द्या दरवळ तो गंध दाही दिशा ।
शोभा येईल मंडपास विविधा । रंगावली काढता ।
उत्साहे उधळूं गुलाल अक्षता । कुर्यात सदा मंगलम् ।।
हा रंजन नाम शिवदे कुळी । नारायणाचा सूत ।
तैसी शोभत कवितासुरूप तनया । आहे विनयान्वीत ।
होतो आज विवाह या शुभदिनी । वाच्चे ध्वनी मंगलम् ।
बोला सब्दिज देवता सुजन हो । कुर्यात सदा मंगलम् ।।
वाद्यांच्या गजरात आजि करू या हा सोहळा साजरा ।
साधू ही मंगल घटिका । पुण्यप्रदा मंगला ।
वराचा बहु पुण्यसंचय म्हणुनी ही लाभली वधु ।
हर्षोत्फुल्ल मने सशास्त्र विधी हा कुर्यात सदा मंगलम् ।।

विद्याधिश गणेश हा गणपती विघ्ने दुरी सारितो ।
कार्यारंभी म्हणुनी त्यासी स्मरूनी, कार्यास आरंभितो ।
वंदुनी कुलदेवता, गुरूवरा । श्री ईश मी प्रार्थितो ।
~~होवो आज विवाह म्हणुनी । आशीर्वचांना स्मरा ।~~
नांदा सौख्यभरे स्वभाव जुळवा । विसरूनी दोषांसही ।
उपदेशा करणे तुम्हास न लगे । आहात सज्ञानहि ।
चिंती प्रेमभरे तुम्हां सकलहिं । उत्कर्ष कीर्ती शुभम् ।
देवो ईश्वर या शतायु युगुला । कुर्यात सदा मंगलम् ।।
त्यागोनी आज ब्रह्मचर्य व्रत हे साक्षी तुम्ही ब्राह्मण ।
स्विकारित अहा वधुवरा । भावी गृहस्थाश्रम ।
सौख्याचा परी मोहजाळ ही । तैसा संसार हा वाटला ।
व्हावे आपण सावधान वदते । कुर्यात सदा मंगलम् ।।
लक्ष्मी विष्णुसवे शिवास गिरिजा । मेघास विद्युलता ।
तेवी ही रजनी तशीच गमते । शशीधरा हता ।
आशीर्वाद तया वदोत सगळे । देवज्ञ हे ब्राह्मण ।
देई त्या यश साधुनी प्रभुवरा । कुर्यात सदा मंगलम् ।।
जीणे हे तव सार्थकी घडविले । माता तथा पित्याने ।
बहिणीने किती लाविले बघ तुला । प्रेमास सद्भावने ।
कन्ये तूं करी सार्थ नांव नवगृही । थोरास त्या वंदुनी ।

महिलांचे विचार असूं दे ध्यानी । कुर्यात सदा मंगलम् ।।
प्राचीस योग आला । रविराज थांबलेले ।
साऱ्या चराचराला चैतन्य लाभलेले ।
विप्रासहित जन हो । शुभ सावधान बोला (३ वेळा)

अवनी उभी इथे ही । हातांत पुष्पमाला ।

ये या वरासमोरी । सौभाग्य मागण्याला ।।

आप्तेष्ट मित्र जन हो । शुभ सावधान बोला । (३ वेळा)

~~आनंद सोहळ्याला हा गंध आज आला ।~~

ऋध्दी नी सिध्दी आता । येथेच थांबलेल्या ।

सन्मित्र सज्जनांनो । शुभ सावधान बोला । शुभ सावधान बोला ।

राधा कृष्ण भोवती गोपींनी । धरूनी फेर केली रासक्रीडा

भक्ती ही त्यांच्या मनी रूजली । देखोनी तो मोहन ।

संसारा विसरूनी त्या रमल्या रासक्रिडेत ।

तैसे तुम्ही वर्ती प्रपंची । कुर्यात सदा मंगलम् ।।

माता आणि पिता तसेच गुरू हे । सारे आहे थोर ते ।

संस्कारा करूनी तुझ्यावरी । घडविले तुला आजवरी ।

कुलाचा जगी मान तो, वाढवी या जीवनी ।

~~ठेवा जाणीव ती दोन्ही कुलाची । देवोनी प्रीतीतया । कुर्यात सदा मंगलम्।।~~

सीता आणि राघव रमले । वनवासा भितरी जरी ।

नेसोनि वल्कले ती जटा । राहिले ऋषीगृही

मानाने ऋषीपत्निने । सीतेस पूजिले आदरे ।

देवो देव तुम्हांस प्रज्ञा । कुर्यात सदा मंगलम् ।।

आहे फार पवित्र सोज्वळ असे । हे ब्रह्मचर्य व्रत ।

पालन केले आजवरी । सत्कर्मी ते लावून साक्षी ।

सत्याने जगी वाटचाल कर तूं । परमेश्वरा ठेवून ।

देवो देव तुम्हा सुयशा । कुर्यात सदा मंगलम् ।।

मायेचा जरी खेळ हा चालतसे । पुरूषास ही प्रकृती ।
शोभे तैसी वधु जीवन सखी । अमुच्या वराप्रती ।
वरमाता सुशीला स्नुषा प्रमिला देखोनि आनंदुनी ।
देई आज आशीर्वचा वधुवरा । कुर्यात सदा मंगलम् ।।

काशी कांची अवंतिका मधुपुरी माया अयोध्या पुरी ।
श्रीमंत द्वारावती सपुण्य जनका विख्यात पृथ्वीवरी ।
क्षेत्रे धर्म परायणे अनुपमे जे, वर्णिती कौतुके ।
~~ते कल्याण वधुवरांसी इतुके । कुर्यात सदा मंगलम् ।।~~
राजा भीमक रूक्मीणीस देखोनि नयनी चिंता करी ।
ही कन्या सगुणा वरा नृपवरा कवणास मी देईजे ।
आता एक विचार कृष्ण नवरा त्यासी समर्पू म्हणे ।
रूक्मी पुत्र वडील त्यासी पुसणे । कुर्यात सदा मंगलम् ।।
गंगा सिंधु सरस्वती च यमुना । गोदावरी नर्मदा ।
कावेरी शरयु महेंद्रतनया चर्मवंती देविका ।
क्षिप्रा वेदवती महासूर नदी ख्याती गया गंडकी ।
पूर्णा पूर्णजळैः समुद्र सहिता । कुर्यात सदा मंगलम् ।।
विश्वामित्र वसिष्ठ सर्वहि ऋषी आले सीता स्वयंवरा ।
सांगाते रघुराज पूर्ण विजयी लावण्य तेजोहिरा ।
हाती बाण धनुष्य घेऊन पुढे । शोभे बरा तो वरा ।
गोसावी सुत स्वामीराज नृप तो । कुर्यात सदा मंगलम् ।।
आली लग्नघटी समीप नवरा घेऊनी यावा घरा ।
गृहयोकने मधुपर्वा पूजन करा अंतरपाटाते धरा ।
दृष्टादृष्ट वधुवरा न करिता दोघे करावी उभी ।
वाजंत्रे बहु गलबला न करणे लक्ष्मीपते मंगलम् ।।

आतेचाच पती अवंती नृपती ही कन्यका श्रीपती ।
जाणोनी स्वरती स्वयंवर श्री मित्रवृंदासवी ।
आणि द्वारापती प्रजी क्षितीपती जिंकोनी मार्ग किती ।
भाऊ दुष्टमती तिचे परतती । दुर्योधनाचे प्रती ।।
विष्णुला कमला शिवास गिरिजा कृष्णा जशी रूक्मिणी ।
सिंधुला सरिता तरूशी लतिका चंद्रा जशी रोहिणी ।
रामाशी जनकात्मजा प्रिय जशी सावित्री सत्यव्रता ।
तैसी ही वधु साजरी वरितसे हर्षे वरासी आता ।।
मस्य: कुर्म वराहकादि नृहरी चौथा बंटू पंचमा ।
श्रीमत् भार्गव राम राघव हरी बौध्द: कलंका नम: ।
हे दहा अवतार भूर्भवधरा पाताळीचे भूपती ।
संरक्षन्तु वधुवरासि सुमती, कुर्यात सदा मंगलम् ।।
चिंता फार करी म्हणे जनक तो हे जानकी नोवरी ।
द्यावी या रघुनायका विधी करे । वाटे तसे अंतरी ।
केला मी पण हा परंतु धनु हे वोढील कोणी परी ।
जावई या रघुनाथ वधुवरा । कुर्यात सदा मंगलम् ।।
श्री वत्सांकित भूषणे तुळशीची आपाद माळा रूळे ।
सिध्द:चारण गुह्यक रवी हाहाहुहु वाकपती ।
गंधर्वादि मरूदगण सुरमनी कुंमाश शेषांगिरा ।
ईशानग्नि नलेंद्र हे वधुवरा । कुर्यात सदा मंगलम् ।।

आली ही शुभकरिणी मधुघटी आनंद चोहीकडे ।
वाद्ये मंगल वाजती, बरसती स्नेहांमृताचे सडे ।
येथे हे गणगोत सर्व जमले । द्याया शुभार्शिर्वाचा ।
नांदा सौख्यभरे कृतार्थ बनवा संबंध हा प्रीतीचा ।।

सेतु हा उभय कुला मिळत असे तेथे नदी सागरा ।
राखा स्नेहबळे कुळे मिसळली संवाद राखा स्वरा ।
ज्येष्ठा वंदुनी वाटचाल पुढली एकात्मतेने करा ।
सत्कर्मे करूनी अखंड अमरा सत्कीर्तीला हो वरा ।।

रामी राजमणी सदा विजयते । राम रमेशं भजे ।
रामेणी भिदना निशाचर चमु । रामाय तस्मै नमः ।
रामात् नास्ती परायणं परतरं रामस्य दास्यो स्महं ।
रामे चितल्या सदा भवतुमे । कुर्यात सदा मंगलम् ।।

कंठी ज्याच्या गरळ असे । माथ्यावरी मंदाकिनी ।
वाम बाहुला गिरिजा वसे । गजचर्म हे कटिवरा ।
पायाशी नंदी केसर वसे । हाती डमरू सदा ।
माजी वेष्टीत वल्कले झळकती । कुर्यात सदा मंगलम् ।।

साधावे हे शुभकार्य जगती । हेतु धरोनी मनी ।
घेती नूतन या व्रता वरवधु । जाण्या गृहस्थाप्रती ।
संसारात तुम्ही उभतया । अभ्यांगता स्वागता ।
होवो प्राप्त सर्व, आशीष तुम्हां । कुर्यात सदा मंगलम् ।।

लक्ष्मी विष्णुसवे शिवास गिरिजा मेघास विद्युलता ।
तेवी ही रजनी तशीच गमते शशीधरा हाता ।
आशीर्वाद तया वदोत सगळे । देवज्ञहे ब्राह्मण ।
देई त्या यशसाधुनी प्रभुवरा । कुर्यात सदा मंगलम् ।।

शिल्पाला घडवित असता । ओतीले मी पंचप्राण ।
सोपविता हे तुम्हा हाती । थरथरते मज मन ।
देवो ईश्वर तुम्हास प्रज्ञा । सौख्यात करा जतन ।

होवो मंगल हा विवाह म्हणुनी । प्रार्थिते मी ईश्वर ।।

मातापूरवासीनी रेणुके देई तव आशीर्वचा ।

धांवोनी येई सत्वरी अैंक हाक या बाळेची ।

राहो अक्षय अखंड तव कृपा या मम कन्येवरी ।

~~दे सुंदर आशीर्वच मम जा माता । कुर्यात् सदा मंगलम् ।।~~

ज्याला लौकीक सृष्टी माजी असती । लग्नादि संज्ञा किती ।

आहे ऐक्य जीवाशिवातील खरे । ते जाणति सांगती ।

जाणो हा क्षण हा उदात्त जन हो । या कारणाने करा ।

हर्षोफुल्ल मने सशास्त्र विधी हा । संपन्न आजला करा ।।

संसारी विपदा अनेक असती । अन मोह ही दुस्तर ।

सारे ही तुळशी कृपे सरूनिया । जातील ते तत्पर ।

निष्ठा ठेवुनिया अनन्य करूं या । भक्ती जिची सतत ।

देवी ही सदया मुमुक्षु । तदा नेईल मोक्षाप्रत ।।

आला आजला गमतसे । हा सौख्यदायी क्षण ।

कृष्णाते वरिते तुळशी । ते धन्य हो जीवन ।

साध्वीचे अति थोर संचित । तिला हा लाभला माधव ।

ज्या लाभापुढती नगण्य अवघ्या विश्वातले वैभव ।।

जेव्हा शीतल मंद गंध भुलवी । त्या मंजिरीच्या मना ।

जेव्हां सुंदर सावळे सुखाविते । ते रूप या लोचना ।

जाति अन थोर संचित । तिला हा लाभला माधव ।

लाभे पावन दर्शनेच सकला । संपत्ती विद्याजय ।।

केलासे बहुपुण्य संचय जिने तो जन्म जन्मांतरी ।

लाभे रूक्मीणीचा म्हणून तिजला । हा जन्म पृथ्वीवरी ।

पूर्वी ख्यात जगांत पावन सती । वृंदा म्हणुनी असे ।

श्रीकृष्णा वरण्यास द्वापार युगी । जन्मास ती घेतसे ।

वृंदाजी तुळशी नी रूक्मीणी जरी । त्या वेगळ्या भासल्या ।
देहाने पृथगात्म केवळ जरी । या भूवरी नांदल्या ।
आत्मा संचरला त्रयीतुन तरी तो एकचि सर्वदा ।
ध्याता हे तुलसी महात्म्य विलया जातील की आपदा ।।
ऐसी सच्चरिता भवाब्धीमधुनी । प्रापंचिका तारील ।
चारी मुक्ती तयास सत्वर । विना सायासहि देईल ।
साधू या तुलसीविवाह घटिका । पुण्यप्रदा मंगला ।
वाद्यांच्या गजरांत आणि करूं या हा सोहळा साजरा ।।
येई मंडपी सुत हा त्रैलोक्य राजा गुणी ।
धन्वंतरी कुलवधु होई तुझी स्वामिनी ।
येता मंगल वेळ घालील गळा ती पुष्पमाळा बरे ।
होई बंधन पुष्पयुक्त जीवना हे मूल्य आजि खरे ।।
शोभे मंगलमूर्ती तोरण पहा । दारी घुमे चौघडा ।
वाटे दाही दिशा सुखा बहरण्या आनंदे घाली सडा ।
लग्नाचा सुख सोहळा प्रभुकृपे आजि तुझ्या पातला ।
देवो देव तुम्हां सदा सुयशा । कुर्यात सदा मंगलम् ।।

देई जो बहुमोल प्रेम परिने । संबोधिता ताईज्या ।
कोणाची असे ती करवली । न ओळखे ही मजा ।
दादा ताई असे बहु कुशलहि । कार्यास या भूषण ।
पुणासी पुजिले तैसे घडविले । सहकार्य ते देऊन ।।
आहे पुत्र पदवीधर । भौतीक शास्त्रज्ञाचि ।
परदेशी करी अध्ययन पुढे । नामास जे वाढवी ।
जीवातील जीवाणु सार्थ बघते ही योगमाया पहा ।

जीवाणु परमाणुने घडतसे । हे विश्व सारे पहा ।।
दिनांना करूनी सहाय्य जगीया । कर्तव्य सोडू नका ।
द्रव्याचा अभिमान ही करू नका । लोभात गुंतू नका ।
राष्ट्राला विसरू नका स्वजनहि । आप्तेष्ट सोडू नका ।
अैसे प्रार्थुनी सकलहि वदतसे । कुर्यात सदा मंगलम् ।।
शोभे ही कमलीनी दृष्टीस ही सोज्वळ ।
आहे देव गणेश हा वर विश्वातील शोभे पतीदेव तो ।
अर्पोनी कमलासमान मन हे पूजी विधात्यापती ।
इच्छा हीच कथोनी आज वदतो । कुर्यात सदा मंगलम् ।।

ब्रह्माचे कुळ शंकर वधुपिता कार्यी सदा तत्पर ।
माता नाम सौदामिनी करितसे नामास त्या सार्थक ।
आनंदाश्रु वियोग अश्रु जमती । नयनांत हे सत्वर ।
देती आज आशीर्वचा वधुवरा । कुर्यात सदा मंगलम् ।।
न्यायाधीश विधीज्ञ योग जमुनी आला सुदैवे पहा ।
कन्या पुत्र विवाह संमत असे हा न्याय त्यांचा पहा ।
रक्षावे कुल नीतीने धरूनिया सन्मार्ग तो प्रीतीचा ।
आशीर्वाद तुम्हां वधुवरा । कुर्यात सदा मंगलम् ।।
प्रपंची फुलबाग फुलविता । जन मानस थकते ।
सर्वांचा विचार करूनी प्रपंच चालविते.
या जगती आनंद मिळतो । सर्वांसुखी बघण्यांत ।
देवो ईश्वर तुम्हां सुबुध्दि । कुर्यात सदा मंगलम् ।।
संसार हा संगर असतो । सतत लढा तुम्ही ।
प्रतिकूल क्षणांना डावलुनी या । यशस्वी व्हा तुम्ही ।

प्रभुने बुध्दी दिली मानवा । उपयोगात आणा तुम्ही ।
तारतम्य जाणुनिया वेळी । कुर्यात सदा मंगलम् ।।

रूपाने अति देखणा वर जसा । शरदातला चंद्रमा ।
लावण्ये अनुरूप गौर वधु ही । गाली खुले रक्तीमा ।
राहो शाश्वत भाव हृदयी । हे शब्द ना विसरा ।
होवो मंगल बोलती बहुजन । आशीर्वचांना स्मरा ।।
हा गंगाधर नाम कौशीक कुळी । नारायणाचा सुत
तैसी शोभत राघवेंद्र तनया । सीता सुरूपांवित ।
होतो आज विवाह या शुभदिनी । वाद्ये ध्वनी मंगल ।
बोला सद्विज देवता सुजन हो । कुर्यात सदा मंगलम् ।।

## १. मौंजीबंधन गीत

अजिंक्य तुझी आज मौंज होणार ।
मामा आले मामी आल्या । आत्या साऱ्या आल्या ।
मावश्याहि आल्या, नाना तात्या बाबा पण आले ।
लाडू त्यांच्या पंगतीत मीच आता वाढणार ।।
करवली मीच दादा माझा मोठा ।
कुठे आहे माझ्या आनंदाला तोटा ।
मोटारीत तुझ्या संगे मीच आज बसणार ।
मुंडावळी तुझ्या माथ्याला मीच बांधणार ।।
हिरवी हिरवी गार मी साडी नेसणार ।
अजिंक्य तुझी आज मौंज होणार ।
नव्या नव्या लंगोटीचा रंग लाल लाल ।

गळ्यांमध्ये घालायची जानव्याची माळ ।

चंपी गोटा करतांना दिसणार तू छान ।

खांद्यावरी तुझ्या देणार पिशवी नी काठी छान ।।

## २. मौंजीबंधन गीत

नेसोनि शुभ वस्त्र पीत बरवे शाल अंगावरी ।

शोभे सुंदर कांती युक्त बटू । हा गोपाल कृष्णापरी ।

नेत्री काजळ हार कंठी रूळतो । डोक्यास मुंडावळ ।

पाठीशी भगिनी उभी धरूनी हाती दिवा मंगल ।।

बटुवर योगे शुभं भवतु सावधान ।

~~माता आणि पिता तसेच गुरू हे । सारेजण थोर हे~~

संस्कारा तुझीया वर करूनिया । जाणीव ते देतात ते ।

आज्ञा पाळुनीया त्यांची सतत । दे आनंद त्यांच्या मना ।

विद्या शील हेच वैभव खरे । ठेवी अशी भावना ।।

आहे फार पवित्र सोज्वळ असे । हे ब्रह्मचर्य व्रत ।

ज्यांचे पालन योग्य तूं करूनिया । होई तू गुणवंत ।

सत्याने जगी वाटचाल करूनि । होई खरा द्विज तू ।

विद्या आणि कला शिकुनिया । होई तू कुलभुषण ।

कुर्यात बटोऽ मंगलम् ।।

भाग्याला सुजनत्व भूषण असे । किंम मौन शौर्यासवे ।

ज्ञानाला समता सुज्ञास विनय । द्रव्यास दातृत्व ते ।

अक्रोधत्व तप क्षमा प्रभुपणा । धर्मास भूषण हे ।

त्या सर्वांसहि मुख्य भूषणे पहा । सतशील ते तत्वता ।

कुर्यात सदा मंगलम् ।।

हा शांत शालीन सोज्वळ असणे । हे भाग्य असते महान ।

जैसी वधु ही लक्ष्मी, हंसरी निष्पाप असणे । हे पुण्य हे महान ।

दोन्ही कुलास ललामभूत होणे । सासरमाहेर धन्य महान ।

अंती या सर्व गोष्टी लाभणे । हे ईश्वरा स्वाधीन ।।

---

## रेशीम गांठ - लग्नाच्या गठबंधनाचे गीत

हंसू लपवित ओठावरती । नयनी अश्रु ओघळती ।

अंतरपाटा आड उभा गं । जन्माचा सोबती ।।

गौरी हार पुजिता ती । दीर्घायुष्य मागे त्या ।

अतुट राहो धागे । मम प्रीतीचे अक्षय त्या ।।

शालू नवा नेसुनी मुंडावळीची शोभा ।

करांत घेऊनी माला । सलज्जतेची आभा ।

पतीसंगती पाहुनी तिजला । जशी चंद्रासवे रोहिणी ।

हर्षाने की मिळूनी सागरा । मिळे वाट तटींनी ।।

सासरी निघतां वळूनी पाहते । माहेराची वाट ।

आईची ही वेडी माया । जणु की रेशीम गाठ ।।

---

## कन्येची पाठवणी

झाले कल्याण लेक लाडकी आनंदाने चालली सासरी ।

आतांच लाजाहोम व सप्तपदी संपली ।

भातुकलीचा खेळ संपला । संसाराचा अर्थ उमगला ।

बालपणांतील तुझ्या स्मृतींना । आज जाग आली ।

समरस होशील नव्या जीवनी । लटकी घडतील रूसणी फुगणी ।

संसाराची चिर मालिका । स्वप्नी मी पाहिली ।।

नरीप नको आंसू आवर गं । दु:ख विसरूनी ओठी हंसू आण गं ।

आठवणींची क्षणोक्षणाला तार मी छेडीली ।।

---

## पाठवणी - २

तुझ्या समृध्द संसारी पाय पुसणे दारी जे ।

लागणार सदा कदा । असो तेवढे माझे ते ।।

तुझ्या समृध्द संसारी । पक्वान्नाच्या भोजनांती ।

घालणार आपोशनी मीच तुझ्या पती हाती ।।

तुझ्या समृध्द संसारी उंची पलंग नी बिछाना ।

माझी चादर असावी आतून त्या पांघरूणा ।।

तुझ्या संपन्न संसारी वस्त्रालंकार विपुल ।

चोळी बांगडी ती असावी माझ्या कडील ।।

तुझ्या संपन्न संसारी असेल रोषणाई भली ।

वाती होऊन झाडीला लामण दिव्याची काजळी ।।

तुझ्या संपन्न संसारी टांगायला आढ्याला ।

असो माझ्या जुनेवारी काळी चिंध्यांची बाहुली ।।

---

## सुनेचे स्वागत

मेंदी रेखियली पाऊले । उगा येती डोळ्यापुढे ।

किणकिणती हातांत । नाजुकसे हिरवे चुडे ।।

सारखी लगबग जोडव्यांच्या तालावर ।

इथे तिथे झगमगे । सोनसळी किनारा ।।

उगीच पानोपानी जाई दारीची लाजते ।

दाराआडून गुणाचे गौरवर्ण मुख डोकावते ।।

कळी कुठे ते कळेना । गंध कोंदटले ते मन ।

आगमनाचे तिच्या मोजती मी क्षणक्षण ।

ये गं माझ्या चंद्रकोरी । उजळाया माझे घर ।

माहेरच्या ममतेने उभे । तव स्वागता सासर ।।

## हिरवा चुडा

पहिली बांगडी माहेराची । आठवण ठेव सदा कर्तव्याची ।

दुसरी बांगडी भाऊ बहिणीच्या प्रेमाची । आठवण ठेव भाऊबिजेची ।।

तिसरी बांगडी पित्याच्या प्रेमाची । कर्णासम औदार्याची ।

चौथी बांगडी बहु प्रीतीची । सेवा ममता सहकार्याची ।

पाचवी बांगडी यश संपादनाची । होऊ नका विचलीत संकटात संसारी ।

सहावी बांगडी यशकीर्ती वर्धमानाची । शांती राहु देत सदैव मनाची ।

सातवी बांगडी वर्धमानाची । सतत सौख्य प्रीती मिळविण्याची ।

आठवी बांगडी सासर माहेर जोडण्याची । प्रयत्न असावे सहकार्याचे ।

नववी बांगडी सासरी जाण्याची । नाही वेळ मागे वळून पाहण्याची ।

दहावी बांगडी सौभाग्य लेणं हिरवा चुडा । उचललास तू आज संसाराचा विडा।

अकरावी बांगडी वळून पाहे माहेराची वाट । आईची वेडी माया जणू रेशमाची गाठ।

---

## विहीण

विहीणबाई करिते लेक तुम्हा स्वाधीन

वंशवेल ही नाजुक सांभाळा तुम्ही जपून ।।

भोळे माझे पाखरू हे । नाही जग पाहियेले ।

संसारात पहिलेच पाऊल ठेवियेले ।

रितभात, वागणूक अहो द्या समजावून ।

लाजरीचे रोपटे हे सदासर्वदा राहील लाजून ।

मूक भाव मूक नजर पाहूनिया समजायाचे

आई परी लावा माया । लेक तुमची समजून ।।

घरकामी सदा दक्ष । हसूं तिच्या नित गाली ।

हवे नको काय कुणा । पुढे पुढे करी बाळी ।

चूक तिची पदरांत घ्या । क्षमा करा गोंजारून ।।

## विहीण

दैवजात स्वदु:खे कन्ये । दोष ना कुणाचा ।
पराधिन आहे जगती । जन्म हा मुलीचा ।
बालपणी माता पिता पालन करिती ।
प्रेमभरे वात्सल्याने तिला सांभाळीती ।
काळ आनंदाचा जातो । बाल्यावस्थेत ।
यौवनाची पडता छाया । शोधितो वराला ।
योग्य वर शोधोनिया । अर्पिती वराला ।
प्रेमभरे सांभाळा हो । लळा तिला लावा ।
वृध्दपणे पुत्रांच्या या मर्जीने रहावे ।
जन्म देवोनिया त्याला परावलंबी व्हावे ।
स्त्री जन्म यातच जातो । नियम हा जगाचा ।

---

## विहीण

सोड आता, सोड मिठी, सोडुनिया माया ।
अपुल्या सासरी जा गं ।
मोतियांची आसवे आवरूनिया गं आवरूनिया ।
आलीस तू पोटी माझ्या जरी बाळे
नाही कधी मज विसर पडला ।
दो दिवसांची ठेव, येईल कुणी घेऊनी जाया ।।
होशील रत सासरी जेव्हां तू आपुल्या ।
विसरशील गं तू माझी माया ।
राहील परी गुंफीत मी
ठेवुनी ताज्या तुझ्या आठवणी बाळपणीच्या ।।

## विहीण

शुभ मंगल दिन हा आला ।

विहीणींनो विनंती तुम्हाला ।।

नवसुमना परी कन्या अमुची ।

स्नुषा जाहली विधिने तुमची ।

जतन आजवर केली साची ।

समजा तनये सम तिजला ।।

जननी जनकाची बहु प्रीती ।

तुम्हा अर्पियली मंगल रिती ।

उय कुलांची वाढो कीर्ती

सुखकर संगम हा झाला ।।

दृढ प्रीतीचे जेवण जेवा

सत्व गुणांचा तांबुल सेवा ।

अद्वैताचा अहेर घ्यावा ।

द्वैत नेऊनिया विलयाला ।।

---

## विहीण (मुलीकडील)

चिंता करू नका मानिली हीच कन्या आम्ही आता ।

जनरीत असे ही जगताची उपवर कन्या पर धन समजती

चिंतेचे कारण नाही आता ।।

नणंद होईल बहिण तिजला दिर राहील भाऊ तिजला

लक्ष्मी घरची तीच आता ।।

घर अपुले समजून राही । नित्य सुखाने जीवन कंठी । परके नाही कोणी आता।

अहो मध्ये आठवणी हरोत तुमच्या । भेटीस धाडीन उभयतांच्या ।

त्याची चिंता नकोच आता ।।

## विहीण (स्वरचित)

तुम्हां अर्पियली मम प्रिय बाला । विहीणींनो तुम्ही आपली म्हणाना ।

मुखी गोड घास आपण तो घ्यावा । वधुला आशीर्वाद गोडसा तो द्यावा ।।

विवाहाचा थाट जरी घडविला । निरोपाचे वेळी श्वास कोंडीयेला ।

कन्या हे परक्यांचे धन । फेडीता हे ऋण विकलांग मन ।

प्रेम तुम्ही द्या हो परक्या जिवाला । लळा तिज लावा अपुल्या घराचा ।

शिक्षण देऊनी केली मी सुजाण । संस्काराचे भाव मनी रूजविले ।

तुम्हा अर्पियेला मम प्रिय ठेवा । प्रेमभरे सांभाळा विनंती तुम्हाला ।

शिल्प घडविता पडले प्रयास । तुम्हा सोपविले विनासायास ।

लीन भाव वेडी असे मम बाला । हळूवार जपा तुम्ही हो मनाला ।

सूज्ञ तुम्ही आहे शिक्षण क्षेत्रात । नसे सांगणे मज अन्य इतरत्र ।।

## विहीण (मुलांकडील)

तुम्ही सोपविली आम्हा तुमची बाला ।
विहीणींनो तुम्ही निश्चिंत असा ना ।।
शिक्षण देऊनी तुम्ही केली सुशिक्षित ।
संस्काराचे भाव मनी बिंबविले ।।
सूज्ञ माझा सुत असे हा अबोल ।
लळा लावुनी त्याला ठेवा आनंदा ।
सासु ही प्रमदा असे शांत गृहिणी ।
तिला साथ दिली अनंतरावांनी ।।
कन्या निलीमा असे सदा बहार
देईल ती त्याला पत्नीचे प्रेम ।
शिल्प घडविता पडले प्रयास ।
तुम्ही सोपविले आम्हां विनासायास ।
प्रेम आम्ही देऊ तुमच्या कन्येला ।
लळा तिला लावू अमुच्या घराचा ।
लीन भाव वेडा असे मम सुत ।
हळुवार जपा तयाच्या मनाला ।
शिक्षण क्षेत्रात असे कन्या सूज्ञ
नसे सांगणे मज । अन्य इतरत्र ।
प्रेम देऊनी त्याला । प्रेम तुम्ही मिळवा ।
हात देऊनी हाती । साथ तुम्ही त्याला द्या ।

## डोहाळे

प्रिय कांतेला डोहाळे अति प्रीती ।

सरदार शहाजी पुसती ।।

श्री भवानी मातेने वर दिधला

म्हणुनिया दिवस हा आला

मज वाटतसे आजपासुनी अपुला । भाग्योदय खचितची झाला ।।

तव मुखचे असा या समयाला । बहु खिन्न कशाने झाला

तुज मनी काय आवडते । तव चित्त कशावर जाते ।

जरी असे फार अवघड ते । ते तू सांग प्रिये आवड ही तव ती ।

जे काय मनोरथ असती ।

म्हणे जिजाबाई आवड मज स्वातंत्र्याची ।

नको बेडी परदास्याची ।

ती विकल दशा गाई ब्राह्मणाची । तशी देशाची धर्माची ।

तो विप्र छळ मज पाहवेना । मज अन्न गोड लागेना ।

परदास्याने मिळवलेली संपत्ती । मज वाटे केवळ माती ।।

म्हणे जीजाबाई तलवार ढाल घेऊनी । नित अश्वावर बैसुनी ।

बहु मराठे वीर सवे घेऊनी । युध्दाशी रणी जावे ।

या कामी मरण जरी येई । आनंद मनाला होई ।

अैकुनी इच्छा शहाजी मनी । म्हणे नवबाळ गाजवील जगी कीर्ती ।।

---

## डोहाळे

मम प्रिय यदुराये डोहाळे काय तुझे हे ।

द्वितीय मासी हे प्रकार सारे । खाविशी वाटती चिंचा बोरे ।

पाडाचे आंबे पिवळे ।

प्रथम गरोदर देवकी बाळी । अंगी घाला चोर चोळी बाई ।

भोजनासाठी गुळ पोळी । पंक्तीला आवर्जून राही ।

चवथा महिना सुभद्रेशी । मम सुंदरी काय म्हणते ।

अंमळ थोडी घेरी येते । स्त्रियांना अनुभव आहे ।

पांचवा महिना सुभद्रेला । हिरवा चुडा घाला तिला ।

नाग केवडा वेणी घाला । हिरवा शालू नेसायला ।

सहाव्या महिन्यात परी । गर्भ तेज चढेल भारी ।

सुंदर छाया तिजवर पडली । आनंदित गर्भिणी आहे ।

सातव्या महिन्यांत अमोलिक । खिरीचे भोजन आहे ।

जेवणाला पुरणपोळी । पिवळ्या शालूचे काय वर्णन ।

आठव्या महिन्यांत ग अठांगुळीची गंमत भारी ।

अर्जुन सुभद्रे शेजारी । अंबुजाची माळ घाली ।

नऊ मास नऊ दिवस सरले । घरी उमलला अभिमन्यु ।

बाळ जन्मा आले । रवि शशीहि लाजून गेले ।

देहाचे सार्थक झाले ।

---

## डोहाळे

बोल बोल कन्ये तव डोहाळे पुरवीन सांग ना ।

सखे पुरवू सांग ना ।

अर्धचंद्र जसा गगनी । पूर्ण चंद्र तसा वदनी ।

तारका या मिळूनी गगनी । तुझ्या करिता रंजनी ।

जाईजुई शेवंती आवडे । गुलाब निशीगंधा तू निवडे ।

हार करी गजरा घाली । फुलवी जीवना ।।

चोर चोळी आधी घालुनी । प्रिय सख्या ही जमल्या सदनी ।

नावे मधुनी हिला घेऊनी जाती उपवना ।

पुत्ररत्न जसा जाई । वाद नाद तैसा होई ।

वाटतात साखर पेढे । आनंदे जना ।।

---

# डोहाळे

तुझे डोहाळे कैसे असती । सांग मुली तू सांग गडे ।

पुरवीन मी क्षणांत इच्छा । दडवू नको लाजू नको गडे ।

गोड खावेसे वाटले तर । आणी लाडू पेढे जिलबी ।

खारट खावे वाटले तर । करीन मी शेव चिवडा चकली ।

पोटभर खा तू छकुले । वेळ नको घालवू गडे ।

तुज नेईन मी बगीच्यात । चोर चोळी घालण्यास्तव ।

सजवीन तुज फुलांनी । आणि भरीन परडी फुलवेण्यांनी ।

तुज लावीन दैनंदिन उटी मी । चंदनाची गडे ।

केळी आंबा संत्री चिक्कु । करीन फळांचा मारा ।

तुला आता न लागू देईन । दुःखाचा वारा ।

भजनी गायनी तू तुला रमव गडे ।

सिनेमा नाटक बघण्यास तुला नेईन थिएटरात गडे ।

गाण्याच्या मैफलीत तुला सतत रंगवीन गडे ।

चिडू नको रडू नको पण ऐकव तुझ्या इच्छा गडे ।।

जीवनसत्वाची कमरतता कमी करण्या । काजू बदाम तू खा गं तान्हुले ।

बाळ तुझा बलवान व सुदृढ गडे ।

देईन रोज केशर दुधातून बाळ रंगाने गोरे करण्या ।

हास गडे खेळ गडे सदा आनंदी रहा गडे ।

रांगत येईल बाळकृष्ण तुझ्या कुशीतून गडे ।

बाळ तुझा खुलविल तुला दिनरात्र गडे।

तृप्त होशील तू देखोनी बाळ खोड्या गडे ।।

## पाळणे

मिटूनी नयन कळ्या नीज रे ।

घननीळा नीज रे ।

श्रीधरा सावळ्या घे झाकुनी । इवल्याश्या पापणीच्या कळ्या ।

बघ नीलकमळ हे शांत सरोवरी निजेल ।

रत्नदीप महालीचे मालविले ।

घरट्यांत झोपल्या राघू मैना कोकीळा ।

झोपू दे ओठीचा अमृतमय पावा ।

दे क्षणभर विसावा पाव्याला मुरलीधरा ।

---

## पाळणे

नीज नीज राजसा रात्र शांत झोपली । रात्र शांत झोपली ।

मऊ मऊ ममताई आई अंथरी ।

निळ्या नभांतील चांदण्याहि झोपल्या ।

झोपल्या राघू मैना । झोपली लेकरे ।

वेलीच्या कुशीतहि रात्र शांत झोपली ।

झोपली गिरी दरी रात्र झोपता ।

हळूच तयावर निजली निशाचर ।

नीज ये चराचरा । झोपली वसुंधरा ।

गात गीत तुजशी आज ।

थोर विश्व माऊली ।

---

## पाळणा (स्वरचित)

नीज नीज बाळा रे राजसा ।

अंगाई गाते आई ।

ममतेची करूनी ओंजळ बाळाला झोपविते गं त्यांना ।

जावळ काळे भोर सरकविते ।

प्रेमाने ती आई ।

कपोली ठेवी मुख । वात्सल्याने ती माता ।

थोपटीत हळूवार हाताने ।

ख न करतां माई ।

मायेचे पांघरूण घालीते

जगताची माऊली ।

बाळासाठी माता मागते

आशीर्वच ईशाते ।

---

## पाळणे (स्वरचित)

नको तू भिरभिर करून राजसा करू राजसा ।

पाळणा हलवू नका कुणी । चिमण्याला चिडवू । राजसा नको तू

आकाशांत चांदण्या बघुनी

हालचाल करीत बाळ हसतो

प्रकाशणारा शशी बघुनी ।

होई बाळ शांत, बाळ होई शांत ।।

आई नसता पाळण्या शेजारी । इकडे तिकडे छकुला पाही ।

चंदामामा बघुनी बाळ । टाळ्या वाजवी टाळ्या वाजवी ।

नकोस कोकीळे तू हि गाऊ। नकोस मैने इकडे येऊ

काऊ चिऊंनो घिरट्या घालुनी । नीज नका चाळवू । नीज नका चाळवू ।

जगावेगळा छंद गं याचा

पाळण्यांत तो खेळायाचा

माता आईला जागवित बाळ माझा ।

लगेच झोपी जाई । लगेच झोपी जाई ।।

---

## पाळणे

जो जो रे बाळा जो जो अंगाई

जग सारे निजले तू जागा का बाई ।

जावळ काळे हळुहळु हले ।

डोळे इवले पेंगुळलेले । नीज अजूनहि तुला का नाही ।

इवल्याशा मुठीत विश्व साठले ।

नेत्री इवलाश्या सौख्य दाटले । वंशवेलीचा तूच आधार ।

बाळाचे इवलेसे रूप साकार । मन मोहणारे कर तू गाई ।

मोहन हे नाव प्रभू श्रीकृष्णाचे । आदर्श ठेवोनी वागावे ।

कुलदीप बाळ विश्वास होई ।

चमकशील तू तेजाने पुढती जगतात ।

धैर्य शौर्याने होशील कीर्तीवान ।

सुयश मिळवोनी । सुखांत राही ।।

## मुलीचा पाळणा

हलविते झुला । हलविते झुला । नीज नीज सुकुमारी कोमलांगी बाळा ।

केला पाळणा हाताचा । दोर बांधीला प्रेमाचा ।

त्यात निजविते चंद्रकोर । माझ्या आवडीची फार ।

कन्या ओझे संसाराचे । जना भय वाटे त्याचे ।

नसे नसे संकट हे । भाग्य आले घरा ।

जसा गुलाब बागेला । तेच मोल शेवंतीला ।

मोल बाई जे पुत्राला । वरचढ मोल कन्येला ।

मायेविन त्या ब्राह्मणाला । कोण देई हो मानाला ।

कन्या रूप हे शक्तीचे । कन्यारूप हे भक्तीचे ।

कन्या रूप हे भोगाचे । आले जन्मा सुखवाया ।

कन्या भगिनी पत्नी माता । रूपे नटली आदी माता ।

जिथे जिथे कन्या पूजिती । तिथे असते मातेची शक्ती ।

मनु तैसा वदला । मान साऱ्या स्त्री जातीला ।।

कन्येविण जग का चाले । कन्येविण घर न राहे ।

कन्या हाच मोक्ष । कन्या पूजन हाच धर्म ।

मूढमती जनांना हे न कळे ।

कन्यारूपी जगन्मातेस लाथाडिती ।

अन् पुत्रांना कवटाळिती ।

तेणे भोगती क्लेष दु:ख दारिद्र्य ।

का की कन्येचा छळ होता ।

जगन्माता महामाया होते क्रुध्द ।

तिचेच हे सारे जग ।

तिच्या कन्यारूपांचा अपमान करता ।

न मिळे धन, सुख नि दारा ।

मिळे केवळ संकटे, छळ अन् मनस्ताप ।

हेच आहे कलियुगीचे भोग्यमान

पुरूषांसी पडे भूल अन् मिळे लाथ ।।

## कृष्णाचा पाळणा (स्वरचित)

कृष्ण जन्मला ग गडे । कृष्ण जन्मला ।

श्रावणांत अष्टमीला पर्जन्य नाचला ।

सृष्टीने काळोखाचा शेला पांघरला ।

नव्हती वाद्ये नव्हत्या सनया । प्रभु प्रकटला । कृष्ण ।

देवकीच्या मनात तो आनंद दाटला ।

कंसभये तत्क्षणी हरि उचलला ।

टोपलीत बसुनी कान्हा । यमुना पार झाला । कृष्ण ।

वसुदेवाने नंदाघरी । हरी निजविला ।

यशोदा माते जवळी ठेवोनी । पिता परतला ।

प्रभू तोच बिलगला । माता यशोदेला ।। कृष्ण ।

जन्मभये हरीच्या । मातेचा श्वास कोंडला

तोच जननीला । हरी विश्वकर्ण दिसला ।

कवटाळुनी हरीला । अश्रुपूर दाटला ।। कृष्ण ।

आकाशी दुंदुभी त्या । वाजू लागल्या ।

पुष्पांचा वर्षाव वरूनी । देवांनी केला ।

हात उडवित कान्हाने । वंदिले देवांना ।। कृष्ण ।

गीतारूपी उपदेश केला जनतेला ।

पार्थाला रणांगणी । का वाचविले हरीने ।

मानवरूप ऋषीकेश हा । देव भासला ।। कृष्ण ।

अष्टमीला जन्मुनीया कंस फसविला ।

जनतेला रिझवाया । सानरूप झाला ।

गोकुळांत गोपीकांशी । रास खेळला ।। कृष्ण ।

राधा ही कृष्ण सखी ठसली मनात ।

संसारी तिजला । दिली साथ जनात ।

राधाकृष्ण अजूनहि जगी बोलतात ।। कृष्ण ।

## मातृभोजन

बाळा तुजला घांस भरविते ।
मूर्त गोजिरी मनी साठविते ।
आजवरी तुज अंकी घेऊनी ।
काऊ चिऊ तुज रोज दाखवुनी ।
घास भरविला गाणे गाऊन ।
आज परी का मन बावरते ।।
शैशव गेले आता संपुनी ।
गुरूगृही जाशील बाळा निघुनी ।
माया वेडी मनी भारावुनी ।
उगाच नयनी हसते रडते ।
मौंजीबंधन गोड सोहळा
तुजसाठी बाळा हो केला ।
समजून घेई । अर्थ आगळा ।
घासातुनी तो तुला सांगते ।
कुलदीपक तू श्रेष्ठ कुळाचा ।
कोमल अंकुर तू या वंशाचा ।
सदा चाल तू सत्य पथाने ।
सत्यातून हे जीवन घडते ।
विद्येला तू येशील जिंकुनी ।
लक्ष्मी येईल चरणी लोळत ।
सुवर्णमयी हो पुढले जीवन ।
आशीर्वचा हा तुजला देते ।

## मातृभोजन

सोन्याचा दिवस भोजन सुग्रास ।

भरविते घास बाळा तुला ।

वरण भातावर तुपाची गं धार ।

होई तू हुशार मुंजमुला ।

करंजी जिलबी लाडू

मावशी आत्या काकू

बहिण ताई भाऊ भरविती ।

करी रे नमन करी रविनारायण ।

दे ज्ञान किरणा माझ्या बाळा ।

मंजुळ मधुर सनईचे सूर ।

कोण तू होणार सांग मला ।

जिलबीचा गोड घास ।

दिशा उजळल्या । सांगती रे तुला ।

नवा तू सानुला बाळ राजा ।

डोळ्यांनी बघणे, कानांनी ऐकणे ।

चित्तात धरावे कांही ऐक ।

ध्येय ठरवुनी पुढे पाऊल टाकावे ।

यश कीर्ती येईल मागोमाग ।।

---